# प्रकरण पहिले

## ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण जीवन

# प्रकरण पहिले

## ग्रामीण साहित्य व ग्रामीण जीवन

### प्रास्ताविक -

मराठी ग्रामीण साहित्याची निर्मिती करणारे श्री·आनंद यादव हे एक महत्त्वाचे लेखक आहेत· ग्रामीण कथात्मक साहित्यामध्ये त्यांनी वैशिष्टयपूर्ण कामगिरी केली आहे· गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये त्यांनी ग्रामीण साहित्याबद्दल एक भूमिका मांडण्याचा सातत्याने प्रयत्न चालविला आहे· त्यांच्या या भूमिकेमुळे ग्रामीण साहित्याच्या अंत:स्वरूपाचा नव्याने शोध घेणे निकडीचे वाटू लागले आहे· खुद्द यादव हे एक ग्रामीण लेखक असल्याने त्यांच्या साहित्याचे आकलन आणि मूल्यमापन करण्याचे येथे योजिले आहे· म्हणून आपण प्रथम त्यांची साहित्य संपदा पाहू·

एक ग्रामीण साहित्यिक म्हणून आनंद यादव यांना मराठी ग्रामीण साहित्यामध्ये मानाचे स्थान आहे·) अगदी शालेय जीवनापासूनच त्यांना कविता लिहिण्याचा नाद होता· दहावी-अकरावी पर्यन्त जेवढया कविता लिहिल्या त्यांचा - 'हिरवे जग' (१९६०) हा पहिला काव्यसंग्रह प्रसिध्द झाला· पुढे १९६२ नंतर लिहिलेल्या निवडक कवितांची भर घालून 'मळ्याची माती' हा संग्रह प्रकाशित केला·

### व्यक्तिचित्रसंग्रह -

'मातीखालची माती' हा व्यक्तिचित्रसंग्रह १९६५ मध्ये प्रकाशित झाला· 'खळाळ'- प्रथमावृत्ती १९६७· द्वितीयावृत्ती १९८४· 'घरजावई' 'माळावरची मैना' (१९७९) हे दोन विनोदी कथासंग्रह म्हणून

वाचकांसमोर आले. 'आशा वहिनींचा सल्ला', 'ह्यो माझा बंगला' या कथा ग्रामीण परिसरातील अज्ञान आणि शहरी सुधारणा यांच्या सीमा-रेषेवर वावरणाऱ्या आहेत. 'आदिताल'-(१९८०), 'ढवरणी'(१९८२) आणि 'पाणभवरे'(१९८२) इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

## ललित लेख -

'स्पर्श कमळे' ललित लेख १९७८ मध्ये प्रकाशित झाले. त्यांचे पुनर्मुद्रण जानेवारी १९८४ मध्ये झाले आहे. स्त्रीकडे विकारी दृष्टीने न पाहता, तिच्या नितांत सुंदर अस्तित्वाकडे, सौंदर्याकडे पाहिले पाहिजे हा दृष्टिकोन स्वीकारल्याने ललित लेखांची गोडी वाढली आहे.

## कादंबरी लेखन -

'एकलकोंडा'(१९५८), 'गोतावळा' (१९७१), 'नटरंग'(१९८०), 'माऊली'(१९८४)या कादंबऱ्या लिहिल्या. 'गोतावळा' या कादंबरीने ग्रामीण कादंबरी वाङ्मय क्षेत्रामध्ये महत्त्वाचे स्थान मिळविले आहे.

## वगनाट्य -

'रात घुंगराची' हे वगनाट्य लिहून त्या क्षेत्रातही आपली चाल आहे, हे त्यांनी दाखवून दिले.

कथा, काव्य, कादंबरी, वगनाट्य, ललित लेख, व्यक्तिचित्रे इत्यादी वाङ्मयप्रकार हाताळले. ग्रामीण जीवन हे साहित्यामध्ये कसे अवतरते ? ग्रामीण जीवनाचे चित्रण कसे करायला हवे ? वगैरे विचार नवसाहित्यिकांपुढे मांडण्याची गरज आहे, असे त्यांना वाटू लागल्याने ग्रामीण साहित्य चळवळीच्या मार्गदर्शनासाठी ग्रंथ लिहिले.

१. 'ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या,' एप्रिल १९७९

२. 'ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव,' मे १९८१

३. 'मराठी साहित्य: समाज आणि संस्कृती,' १९८५

त्यांच्या या साहित्यापैकी 'मातीखालची माती', 'खळाळ' आणि 'डवरणी' या तीन कथासंग्रहांचा सविस्तर अभ्यास करावयाचा आहे.

हा अभ्यास करताना ग्रामीण साहित्याच्या स्वरूपाबद्दल काही एक निश्चित भूमिका स्वीकारणे योग्य ठरेल. या भूमिकेनुसार ग्रामीण साहित्याचे नागर साहित्याहून वेगळेपण सांगणे आवश्यक ठरते. ग्रामीण साहित्यामध्ये समाजाचे आणि मनाचे चित्रण काही विशिष्ट प्रकारचे असते काय याचा येथे शोध घ्यावयाचा आहे. या शोधानंतर ग्रामीण साहित्याच्या मूल्यमापनासंबंधी काही नवे निकष उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या निकषानुसार आनंद यादव यांच्या कथांचे आकलन आणि मूल्यमापन केले असता त्यांच्या लेखनासंबंधी नवे निष्कर्ष काढता येण्याची शक्यता वाटते. म्हणून येथे तशा प्रकारचा अभ्यास करण्याचे योजले आहे.

आनंद यादव यांनी ग्रामीण कथेच्या संदर्भात पुढील प्रमाणे विवेचन केले आहे.

" खेडेगाव, तेथील जीवन-पद्धती, तेथील अशा रीती, शेती, तेथील निसर्गाशी मातीशी असलेला मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्टयपूर्ण संबंध , तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा आणि त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या, इत्यादी आणि त्यातून उद्भवणारे गोष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्टये त्या कथेत येतात. ती त्या खास ग्रामीण अनुभूतीतून जन्माला येते."[१] त्यांचे हे विवेचन ग्रामीण साहित्याला लागू पडते.

## ग्रामीण संवेदनशीलता -

गो॰मा॰पवार यांनी ग्रामीण साहित्याचा विचार 'ग्रामीण संवेदनशीलता' या संकल्पनेच्या अनुरोधाने केला आहे॰ त्यांच्या मते, 'ग्रामीण साहित्य' ही वर्णनपर संज्ञा आहे॰ ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक नाटक या शब्दप्रयोगातून ऐतिहासिक, सामाजिक ही विशेषणे केवळ वर्ण्य विषयाचा निर्देश करतात॰ त्याप्रमाणे 'ग्रामीण' हे विशेषण निर्देश करणारे विशेष्य आहे॰ म्हणून ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करणारे साहित्य हे ग्रामीण साहित्य म्हणता येते॰ यापुढचा विचार म्हणजे कोणते ग्रामीण साहित्य अस्सल ठरते ? गुणवत्तेच्या दृष्टीने वरच्या दर्जाचे ठरते हा होय॰ ग्रामीण साहित्याचा अस्सलपणा ठरविण्यासाठी ग्रामीण साहित्याची 'ग्रामीण संवेदनशीलतेची' संकल्पना गो॰मा॰पवार यांनी मांडली आहे॰' ती प्रस्तुत संदर्भात स्वीकारण्याजोगी वाटते॰ 'अनुभव घेण्याच्या क्षमतेला आणि घाटणीला आपण लेखकाची संवेदनशीलता म्हणतो॰' जो लेखक ग्रामीण जीवनात वाढला असेल, ज्याने ग्रामीण जीवनाचा आत्मा आत्मसात केला असेल त्याची संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता म्हणता येईल॰ ग्रामीण जीवन आणि शहरी जीवन असा दोन जीवनपध्दतींमध्ये आपल्याला फरक करावा लागतो॰ एकमेकाशी लागाबांधा असणे, त्या अनुरोधाने जीवन जगणे हा ग्रामीण जीवनरहाटीचा गाभा आहे॰ ग्रामीण जीवनपध्दती ही एक प्रकारे सामुहिक जीवनपध्दती असते॰ समाजातील सगळेजण एकमेकाशी बांधलेले आहेत॰ अशी जाणीव त्या व्यक्तिच्या ठायी निर्माण होते आणि ती जीवनाचा अनुभव स्वयंकेंद्रितपणे न घेता समाजशील वृत्तीने मानव्याच्या व्यापक भूमिकेवरून घ्यायला लागते॰ या प्रकारे अनुभव घेण्याची क्षमता व घाटणी म्हणजे 'ग्रामीण संवेदनशीलता' होय॰ ग्रामीण साहित्याचा अस्सलपणा हा त्या लेखकाच्या लेखनातून ही ग्रामीण संवेदनशीलता समर्थपणे प्रकट होते की नाही यावरून ठरतो॰

शहरी जीवनपध्दती ही व्यक्तिकेंद्रित जीवनपध्दती असते. शहरी वातावरणात वाढलेल्या व्यक्तीची संवेदनशीलता स्वाभाविकपणेच समाजाचा सामग्र्याने विचार करण्याची नसते तर व्यक्तीला महत्त्व देणारी असते. शहरी संवेदनशीलतेच्या तुलनेत ग्रामीण संवेदनशीलतेची वैशिष्टये स्पष्टपणे प्रत्ययाला येतील. ग्रामीण लेखकाचे अस्सलपण व लेखक म्हणून असणारे चांगलेपण त्याच्या संवेदनशीलतेच्या अनुरोधाने ठरवू शकतो.[१२]

खेडेगावातील ग्रामीण जीवनाचे स्वरूप काय असते, तेथील सामाजिकता कोणत्या स्वरूपाची असते, ग्रामीण जीवनाचे प्रमुख पैलू कोणते असतात हे आपण आता विचारात घेऊ. ग्रामीण जीवनाच्या किती पैलूंचे एखादा लेखक किती व्यापकपणे व सहजीपणे चित्रण करतो ते सुध्दा या अनुरोधाने अनुभवता येईल.

## ग्रामीण साहित्याचा स्वरूप विचार -

महाराष्ट्रातील सुमारे ८५% लोक ग्रामीण भागात राहतात. महाराष्ट्राची जीवनपध्दती ही ग्रामीण स्वरूपाची आहे. ग्रामीण विभागामध्ये शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. शेतकरी हाच समाजरचनेत केंद्रबिंदू बनला. शेती व्यवसायाशी निगडित अशी समाजरचना बनली. बारा बलुतेदार आणि शेतकरी यांचा अपरिहार्य असा दृढ संबंध निर्माण झाला. सुतार, लोहार, चांभार, मांग, महार, कुंभार वगैरे बलुतेदार मंडळी ग्रामीण जीवनपध्दतीचा अपरिहार्य भाग बनली. शेतकरी आणि बलुतेदार यांच्यामध्ये एक प्रकारे अतूट नातेसंबंध निर्माण झाल्याने त्यांच्या मनाची घडणही तशीच आहे. व्यवसायात भिन्नता असूनही एक प्रकारची सामुहिकता दिसते. गरजापूर्तीसाठी ही सर्व बलुतेदार मंडळी एकत्रित राहिली. अठरापगड जाती आणि बारा बलुतेदार या सर्वांच्या एकतानतेने ग्रामीण जीवन व्यवहार गुंफले त्यामुळे ग्रामजीवन परस्परावलंबी झाले.

खेडेगावाच्या जीवनातून अंकुरणारे, फुलणारे, मातीखालच्या खबदार मातीतूनच संवेदना जपणारे मन दिसते. व्यक्तिजीवनाची पाळे-मुळे समाज-जीवनात खोलवर रुजलेली असतात. म्हणूनच त्या त्या लेखकाकडून, साहित्यि-काकडून निर्माण होणाऱ्या साहित्यात त्याच्या समाजजीवनाचे प्रतिबिंब उमटते. साहित्यिकाच्या लौकिक जीवनाचा प्रत्यय साहित्यामध्ये येतो.

शेतकरी, शेती व्यवसाय, शेतकरी वर्गाचा ग्रामीण जीवनावर असलेला प्रभाव, बलुतेदारी, जातीसंस्थेची उतरंड, धर्मसंकेत, नीतिसंकेत अंध:श्रध्दा, अज्ञान, दारिद्र्य असे ग्रामीण जीवनाचे अनेक पैलू आहेत. आता त्यांचा विचार करावयाचा आहे.

## ग्रामीण समाजरचना -

ग्रामरचनेमध्येही एक प्रकारची विशिष्टता आहे. गावात मध्य-भागी पाटील-कुलकर्ण्यांचे वाडे, त्याच्या भोवती वाणी-उदमी यांची वसतीस्थाने, विशिष्ट जाती-धर्माची अनेक घरं एकत्रित म्हणून धनगरगल्ली, जैनगल्ली, वगैरे. रामोसवाडा, होलारवाडा, मांगवाडा, महारवाडा, वगैरे नामाभिधाने त्या त्या गल्लीची, आळीची प्रातिनिधिक रूपे होत.

## श्रेष्ठ-कनिष्ठता -

समाजामध्ये शेतकरीच बहुसंख्येने असल्याने त्यान्चाच प्रभाव संपूर्ण समाजावर राहतो. ग्रामीण जीवन-व्यवस्थेचा पाया कृषि-केंद्रितता आहे. शेतकरी-बलुतेदार यांची परस्पर पूरकता, त्यातून निर्माण होणारी जीवन-मूल्ये सदैव प्रतीत होत राहतात. श्रेष्ठ-कनिष्ठतेवर आधारलेली उतरंड हा एक मुख्य ग्रामजीवनाच्या वैशिष्टयाचा भाग मानावा लागतो. महार मांग, चांभार या समाजाला अस्पृश्य मानले गेले. या अल्पसंख्य किंवा दारिद्र्याशी झुंजता-झुंजता दिवस कंठणाऱ्या समाजाची इतराकडून सातत्याने पिळवणूक होते. आर्थिक पाठबळ नसल्यानेही असे शोषण होत असण्याची

शक्यता नाकारता येत नाही. ग्रामदैवताच्या यात्रेच्या तेली भंडा-याचा (प्रसादाचा) अग्रहक्काचा मान पाटील कुलकर्ण्याचा. पण त्यातला अत्यल्प प्रसाद सुध्दा महार मांग यांच्यापर्यन्त पोहोचेल की नाही याबद्दल ठामपणाने काही बोलता येत नाही./ कित्येक वेळा अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षणासाठी शाळेत एकत्रित बसू दिले जात नाही/ धर्मकार्यामध्ये स्पृश्य-अस्पृश्यता विशेष मानली जाते./ लग्नाचे व-हाड डावीकडून का उजवीकडून जायचे यासंबंधातला वाद त्या त्या जाती-जातीच्या श्रेष्ठ कनिष्ठतेवर अवलंबून राहतो./ ही जाती निहाय समाज रचना अतिशय पक्क्या स्वरूपात दिसते./ क्वचित प्रसंगी रोटी व्यवहार मान्य केला जातो पण बेटी व्यवहाराबाबत तर जातिसंस्थेच्या भिंती खूपच पक्क्या, मजबूत बनविल्या आहेत./ ग्राम रचनेचा, समाज-जीवनाचा एक अंतर्भागा पूर्णपणे सुसंबध्दपणे काम करीत असतो म्हणून ग्रामीण समाजरचनेत नागर समाजाइतका झटपट बदल झालेला नाही.

/जातीनिहाय कामाची विभागणी -

गावगाड्याची अंतर्गत रचना ही बलुतेदार-आलुतेदार यामुळे समजते. कृषिकेंद्रित समाजरचनेमध्ये बलुतेदाराला विशेष महत्त्व आहे. शेतक-याला आवश्यक ते ते लाकडी साहित्य सुताराकडून, कातडी साहित्य चांभाराकडून अशी विविध स्वरूपाची कामे करवून घ्यावी लागतात. ही सारी परस्परपूरक कामगिरी पारंपारिक स्वरूपाची आहे. बापाचा व्यवसाय मुलाने पुढे चालवावा हा जणू अलिखित संकेतच आहे. तराळाने दवंडी पिटावी, महारानं मयताचा सांगावा द्यावा, तालुक्याला वर्दी द्यावी वगैरे ही चालत आलेली कामे तशीच परंपरागत पध्दतीने पुढे चालविली जातात. जात आणि त्याचा व्यवसाय यांच्या एकत्रीकरणातूनच काही म्हणी निर्माण झाल्या. 'अस्वलापेक्षा दरवेशाचा दंगा जास्त,' 'बामणाघरी लिवणं, कुणब्याघरी दाणं, महाराघरी गाणं' अशा म्हणीतून जातीचे पारंपारिक व्यवसाय निर्देशिले जातात.

फिरस्ते ही एक स्वतंत्र जमातीच आहे. त्यामध्ये घिसाडी, कोल्हाटी, डोंबारी, गारुडी, दरवेशी, लमाणी, यांचा समावेश होतो. काही प्रमाणात मनोरंजन, वनौषधी वैदूकडून आणि घिसाड्याकडून विळे, कोयती, कुदळी, खुरपी यांची गरज भागविली जाते म्हणून या फिरस्ते लोकानाही काही विशेष किंमत असते. वंशावळ सांगणाऱ्या हेळव्याचाही समावेश फिरस्त्या मध्येच होतो. नंदीवाले, माकडवाले, गारुडी या फिरस्त्यानाही गावगाड्यामध्ये समावेश करून घेण्यात येतो.

## शेती-शेतकरी: ग्रामीण जीवन व्यवस्थेचा पाया -

आपली भारतीय संस्कृती कृषिप्रधान आहे. शेती आणि शेतकरी यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने उत्पन्नाबद्दलही निश्चितपणे काही विधान करता येत नाही. म्हणूनच त्याची वृत्ती दैववादी बनलेली दिसते. माणसाचे एकंदर जीवनच पावसावर अवलंबून आहे. म्हणून पावसाच्या दहा नक्षत्रांना विशेष महत्त्व आहे. रोहिणी नक्षत्रापासून तो स्वाती-विशाखा नक्षत्रांपर्यन्तच्या काळामध्ये पिके येतात. शिवाराच्या फुलण्याने - सुकण्यानेच शेतकऱ्याचे निदान एका वर्षाचे तरी भवितव्य ठरत असते. या आपुलकीपोटीच कुणब्याचे तोंडी आजही शेतासंबंधी 'काळी आई' असा शब्दप्रयोग असतो. ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितीनुसार वर्गवारी केल्यास तीन गट दिसतात.

(१) सधन बागाईतदार - बागाईत शेती. मजुराकडून शेती करवून घेतली जाते. शेतीला पाणी पुरवठा करण्याची सोय असते म्हणून उत्पादन जास्त होते.

(२) मध्यम वर्गीय शेती - जेमतेम शेती, उत्पादन सुध्दा चांगले नाही. कमी नाही पण बऱ्यापैकी आहे. असा मध्यमवर्गीय शेतकरी आणि शेती असते.

(३) शेतमजुर स्वत:ची शेती अत्यल्प असते किंवा नसतेही· दररोज एका शेतक-याकडे शेतमजूर म्हणून - रोजंदारीने काम करीत असतो· बागाईतदार शेतक-याला अशा शेतमजुराची म्हणजेच रोजगा-याची गरज असते·

निसर्गावर, प्राणिसृष्टीवर माया -

भारतीय शेतकरी हा सर्वस्वी पावसावर अथवा निसर्गावर अवलंबून असतो· म्हणून त्याची मनोधारणा ही ' दैववादी ' बनलेली दिसते· अशावेळी शेतकरी निसर्गाची पूजा करण्यासाठी आतुरलेला असतो· नारळी-पौर्णिमा, वटसावित्री, गुढीपाडवा, दस-याला (विजयादशमीला) शमीपूजा कोजागिरी वगैरे सण निसर्गातील वृक्ष, वनराईची पूजा करण्यासाठीच निर्माण केले· शिवार बहरलेल्या अवधीतच दिवाळी सारखा आनंदोत्सव येतो यातही एक प्रकारची पूजाच असल्याची जाणीव होते·

शेती व्यवसायासाठी प्राणी आवश्यक असतात· गायीला संस्कृती-मध्ये अनादिकाळापासून मान दिला आहे· बैलपोळ्याला बैलाची पूजा केली जाते· शिवाय शंकराचा वार सोमवार म्हणून या नंदी-बैलाला प्रत्येक सोमवारी सुटी असते· पाळक दिवस म्हणून शेतकरी सोमवार पाळतात· राखणदार म्हणून कुत्र्याचा गौरव होतो· रात्री-अपरात्रीच्या प्रवासात तो सोबतीला असतो· नागपंचमीला नागाची आराधना केली जाते· उंदरांचा नायनाट करणा-या या नागाची संरक्षक म्हणून आराधना केली जाते·

आश्विन महिन्यात कृष्ण-पक्षात पावसाला नैवेध करण्याची पध्दत आहे· खूप दिवस पाऊस नाही बरसला तर प्रसंगविशेषी गर्दभराजाची आराधना करतात· धनगर समाज हा मेंढयांचा-बक-यांचा बगा सांभाळूनच उदरनिर्वाह करतो· दुधासाठी गायी-म्हैशी, शेळ्या यांचा सांभाळ केला

जातो. काही लोक दुय्यम पण बिनखर्चाचा व्यवसाय म्हणून कोंबड्या बाळगतात.

शिवारावर माया करणं हा तर शेतक-याचा मूळ स्वभावच आहे. शक्य तितक्या प्रामाणिकपणे तो त्या शेतीशी आणि अनुषंगाने येणा-या व्यवसायाशी प्रामाणिकपणाने तो राबत असतो. परमसंतोषाने तो त्याची पूजा बांधतो.

दारिद्र्य:खेडूतांना शाप -

अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन गरजा मूलभूत आहेत. शरीर जगविण्यासाठी तरी अन्नाची गरज असतेच. लहरी निसर्गामुळे उत्पनाची निश्चितता नाही. म्हणून केवळ 'जगणं' ही बाब सुद्धा शिक्षा वाटू लागते. 'जगणं' कठीण' आणि 'मरण' मुश्किल अशी त्रिशंकूसारखी विचित्र अवस्था झालेली असते. पोटासाठी भांडणारी माणसं ग्रामीण भूभागामध्ये दिसतात. दारिद्र्याची तीव्रता ग्रामीण भागामध्ये जास्त जाणवते. पाचवीलाच दारिद्र्याची पूजा करावी इतके दारिद्र्य अंगीभूत दिसते. माणदेश मधील व्यंकटेश माडगूळकरांची माणदेशी माणसं असोत नाही तर अण्णाभाऊ साठे यांची वारणाकाठ जागविणारी माणसं असोत, आटपाडी परिसरातील शंकरराव खरात यांची दारिद्र्याशी झुंजणारी पात्रे असोत, सर्वांच्या ठायी एकच भाग आहे आणि तो म्हणजे कमालीचे दारिद्र्य .पोटाची आग शमविण्यासाठी त्यातून पर्यायी मार्ग शोधले जातात.

चोरी - दारिद्र्यावर उपाय -

उत्पन्नाचे सारे सनदशीर मार्ग संपले की मग माणसाला चोरीची वासना होते. सुगीच्या दिवसात काढणी-च्या वेळी ज्वारीची कणसं झाकून ठेव, शिवारातील चा-याची चोरी कर, भेंडी, गवारी, वांगी,

भोपळा, चवळी वगैरे माळव्याची चोरी कर किंवा ऐन झडीच्या पावसात कडब्याची चोरी कर· असे विविध प्रकार दिसतात· खाण्या-पिण्याची किंवा वैरण-चा-याची चोरी करावी लागते· याच वस्तूंची गरज भासते यावरून तेथील प्रा जीवन म ध्य जीवनाशी किती एकरूप झाले आहे हे दिसते· अल्पसंतुष्ट माणसं यापरते ती कोणत्या वस्तूची चोरी करणार ?

धर्म-श्रध्दा-नीती-संकेत -

ग्रामीण परिसरातल्या विशिष्ट वातावरणामुळे माणसाचे मन संवेदनशील - श्रध्दाळू बनते· संस्कारातून संस्कृती आणि संस्कृतीतून मनाची जडण-घडण होते· या संस्कारातूनच व्यक्तिमनाला आकार येत जातो· व्यक्तित्वाला साधारणपणे तीन पैलू असतात·

एक - वैयक्तिक मानसिक पातळीवरचे व्यक्तित्व·
दोन- कौटुंबिक पातळीवरचे सहयोगी जीवन·
तीन- सामाजिक पातळीवरचे सामूहिक जीवन·

समूह जीवन ग्रामीण परिसराचे वैशिष्टय आहे· नागर समाजाहून-ही ग्रामीण परिसरामध्ये धर्मसंकेत विशेषत्वाने आढळतात· पांढरीतल्या देवावर म्हणजे त्या ग्रामदैवतावरच विशेषत्वाने भरवसा असतो· म्हसोबा बिरोबा, खंडोबा, धुळोबा या देवावर भरवसा असतो· आपल्या गाव-शिवेवर दुस-या गावाने आणून सोडलेला मरीआईचा गाडा वाजत-गाजत सांजवेळी पुढील गाव-शिवेवर सोडला जातो· तुकाई, अंबाई, कुसाई, जखुब्वा या सारख्या थळपांढरीतल्या देवतांची पूजा करण्यातही आनंद मानला जातो· धर्माच्या या विशिष्टत्वाने तो समाज एकसंध राहतो·

धर्म - धर्म हा विधी आचरणाने अस्तित्वात येतो· तर्क-बुध्दीच्या पलीकडच्या विश्वात धर्माचा उगम होतो· धर्म कथेला चिकित्सा मान्य नसते· कधीही, कोणालाही, कोठेही न भेटलेल्या, न दिसलेल्या देवावर

विश्वास ठेवला जातो हेच धर्माचे खरे वैशिष्टय म्हणता येईल. परंपरागत आचार-विचारांना फाटा धायला ग्रामीण मन तयार नसते. अंतर्गत अतूट नात्यांनी पण अतिशय सुसंबध्द विणलेले ग्रामजीवन धर्माला विशेष महत्त्व देते. मुंज, व्रताचरण, नैमित्तिक कर्मे, नवस, विवाह, बारसं, बारावं, चार्तुमास, मुल जन्मल्यानंतर तिसऱ्या दिवशी नशीब लिहीणं, पाचवी पुजणे वगैरे अनेक विधी, श्रध्दा आणि धर्म यांच्या संगतीने निर्माण झाले आहेत आणि ते टिकून राहिले आहेत.

नीती -

मनुष्य जीवन सुकर होण्यासाठी काही बंधने निर्माण करावी लागली. लिखित कायद्यापेक्षा अलिखित स्वरूपाचे नीतिनियम जास्तच चिवट असतात. वयाने ज्येष्ठ, संपतीने श्रेष्ठ अशांचा समाजाने मान राखावा, माय-पित्याला परमेश्वरासमान मानावे, परस्त्रीशी संग करू नये. हे आणि अशाच स्वरूपाचे नियम मनोबंधनासाठी निर्माण झालेले दिसतात. नागर जीवनापेक्षा ग्रामीण जीवनामध्ये अशा स्वरूपाचे नीतिनियम जास्त काटेकोरपणाने पाळले जातात. ग्रामजीवनातील अतिशय चांगली बाजू म्हणून नीतीचा संदर्भ देता येईल.

खेड्यातील समाज जीवनाबद्दल आनंद यादव म्हणतात, "खेड्यातील संबंध हे एकपदरी, सरळ असतात. कारण समाज लहान असतो. संबंध स्थिर असतात. त्यात बदल करणे तेथील मर्यादित समाजात फारसे शक्य नसते. त्याचाच एक परिणाम असा झाला की खेड्यातील जीवन हे सामूहिक असते. एक घर दुसऱ्या घराला आतून बाहेरून माहीत असते. त्यामुळे एखादी अवैध, अनैतिक रीतिबाह्य गोष्ट करताना नकळत समाजाचा दाब व्यक्तीच्या मनावर येतो."[३]

## संकेत -

अनिर्बंध मनाला बंधनात जखडून ठेवण्यासाठी संकेताची निर्मिती झाली. 'शपथ' या शब्दाला तसा विशेष अर्थ नाही. पण एखाद्या घटनेचा अतिरेक होऊ नये म्हणून बंधन निर्माण झाले आहे. पपई, भोपळा या अपूर्ण वनस्पतीचे दर्शन सकाळी नको, आमावस्येला भूतांचा मेळावा, पौर्णिमेला साती-आसरांची आरास, भूतबाधेवर उतारा, तिकाटयावर सात धान्याचे कडबोळे, दृष्ट काढणे वगैरे अनेक गोष्टींचा समावेश होतो. या संकेतामागील शास्त्रशुध्द कारणमीमांसा फारशी उपलब्ध नाही. हया गोष्टी का करावयाच्या ? यासंबंधी चिकित्सक विचार करण्याची त्यांच्या श्रध्दाळू मनाला गरज वाटत नाही. ग्रामीण भागामध्ये असे संकेत खूप आढळतात. त्या वातावरणानुसार त्या माणसांचे वागणेही बरोबरच वाटते.

अंधश्रध्दा, अज्ञान, संकेत यावरच ग्रामीण लोकांचा जास्त विश्वास असतो. विषमज्वराचा ताप असला तर ताईत, दोरे, गंडे यांचा वापर करत बसतील अशी विचित्र अवस्था असते. कष्ट करून वस्तू मिळविण्याऐवजी नवस बोलून वस्तू मिळविण्याचा प्रयत्न करतील. अशा स्वरूपाची मनोरचना हेच ग्रामीणतेचे वैशिष्टय आहे.

## कुटुंबरचना विचार -

कुटुंबरचनेमुळे व्यक्तीला स्थैर्य प्राप्त होते. विभक्त कुटुंबापेक्षा एकत्र कुटुंबाला विशेष महत्त्व असते. एकत्र कुटुंबपध्दतीमुळे मनोरचनेत मूलगामी बदल होतो. सर्वसमावेशकतेची जाणीव असते. विभक्त कुटुंबातील व्यक्तीच्या मनाची प्रवृत्ती थोडीशी एककल्ली असते. काही वेळेला पराकोटीचा एकलेपणा विभक्त कुटुंबपध्दतीमध्ये दिसतो. एकत्र कुटुंबपध्दतीमध्ये साधारणपणे तीन पिढया नांदत असतात. आजोबा-आजी, आई-वडील, काका-काकी, चुलत भावंडं, दीर-नणंद, आत्या, वगैरे अनेक नाती विविधतेने एकत्रित आलेली असतात. वीस-पंचवीस माणसं एकत्रित रहात असतात.

त्या नातेसंबंधामध्ये एकसंधत्वाला किंमत आहे. शेती व्यवसायामध्ये माणूसबळाला खूप महत्त्व आहे म्हणून सोयरिक जमवितानाही मुलीकडचा गोतावळा किती मोठा आहे याचा विचार केला जातो. अडचणीच्या वेळी नांगरणी, वखरणी यांची अपेक्षा केली जाते. कुटुंबाची विस्तृतता ही भूषणावह गोष्ट मानण्यात येते.

## पुरुषसत्ताक कुटुंबपध्दती -

घर - वाडा, धन - दौलत, शेतीवाडी वगैरे स्थावर जंगम संपत्तीचा उपभोग स्त्री-पुरुष घेत असतात. पण अंतिम हक्क पुरुषाचाच आहे. गृहव्यवस्था स्त्रीकडेच असली तरीही अंतिम सत्ता पुरुषाचीच असते. स्त्री-वेल पुरुष झाडाच्या संगतीने वाढते अशी दृढ समजूत आहे. दुय्यम दर्जाच्या स्त्रीच्या भावनाना महत्त्व नाही. तिची हौस पुरविली जात नाही. आर्थिक कुचंबना आणि स्त्रीचे दुय्यम स्थान यामुळे तिची हौस अपुरीच राहते. चूल, मूल, गृहव्यवस्था आणि शेतामध्ये राबण्यासाठी हात एवढया कामातच गुंतविल्याचे जास्तीत जास्त धोरण दिसते. सासुरवाशिणीला जाच केला जातो. खाण्या-पिण्यात आबाळ केली जाते, नशिबातली राबणूक मात्र सुटत नाही. ही स्त्रीची अवस्था आहे. लग्नातही वरपक्षाकडील मंडळीची अरेरावी असतेच. कुटुंबात स्त्रीचे स्थान दुय्यम म्हणून हौस पुरविली जात नाही.

## निसर्गाभिमुख जीवनसृष्टी - आनंद निर्मितीसाठी सण-उत्सव वगैरे -

मुख्य व्यवसायाला अनुसरूनच त्या भूभागातले सण - उत्सव निर्माण होतात. ग्रामीण भागामध्ये शेती हाच मुख्य व्यवसाय आणि त्याला अनुसरूनच सण निर्माण झाले. व्यापाऱ्यांच्या जगतामध्ये 'दिवाळी' विशेष उत्साहाने साजरी केली जाते. शेती व्यवसाय शारीरिक कष्टाशी निगडित आहे म्हणून निसर्गाची साथ, शेतातील पिके, उपलब्ध सोयी आणि झालेली

सवड यांच्या मेळाने सणांची, उत्सवांची निर्मिती झाली.

माघ-फाल्गुन पर्यन्त शेतीची सर्व कामे संपतात. चैत्रात निसर्गाला पालवी फुटू लागते. आणि वैशाख सजविण्याचा विचार सुरू होतो. विवाह सोहळा संपविला जातो. नववर्षाच्या स्वागतासोबतच नवागताचे स्वागत करण्यात मन गुंतलेले असते. चैत्रातच विशेषत: नाईकबा, जोतीबा, सिद्धेश्वर या प्रमुख कुलदैवतांची यात्रा भरविली जाते. खूप दूरवरून सासणकाठ्या आणल्या जातात. गावोगावच्या ग्रामदेवतांची यात्रा याच चैत्र, वैशाख, ज्येष्ठ या तीन महिन्यात. पौष, माघमध्ये महाशिवरात्र, रेणुका यात्रा या मोठ्या स्वरूपातल्या यात्रा दिसून येतात. दक्षिण महाराष्ट्र आणि कर्नाटकाचा उत्तर भाग यामध्ये सौंदत्तीची 'यल्लम्माची यात्रा' विशेष मानाची दिसते.

त्यातल्या त्यात सवड काढून महाराष्ट्रातील वारकरी आषाढी आणि कार्तिकी अशा दोन वा-या पूर्ण करतो. ठिकठिकाणच्या संतांच्या पालख्या आणि टाळ...मृदंगाच्या नादात हरिनामाचा जयघोष ऐकू येतो. श्रावणामध्ये सत्यनारायणाची पूजा केली जाते तर खंडेनवमीला शस्त्रांची, अवजारांची पूजा करण्यात येते आणि कोजागिरी पौर्णिमेला शिवाराची आराधना होते. चैत्रातल्या धनगरांच्या यात्रेत भाकणूक (हुईक) केली जाते. वर्षाचे भविष्य सांगण्याची पद्धती असते. चैत्र पौर्णिमेला हनुमान जयंती, ज्येष्ठात बैलपोळा, श्रावण तर केवळ सणांचाच महिना, नारळी पौर्णिमेचा समावेश त्यातच होतो, भाद्रपदामध्ये गौरी गणपती वगैरेचा सण आहेच. शिवाय मुस्लीम समाजाचे डोले नाचविणे, सजविणे, आरास करणे याही गोष्टी हिंदु संस्कृतीमध्ये दिसून येतात.

## जत्रा-खेळ-तमाशा -

या सर्व समावेशक सणांशिवाय स्थानिक यात्रा मौजेसाठी भरविल्या जातात. सांजवेळी तमाशाचा एखादा फड उभा राहतो. आंबलेल्या, शिणलेल्या मनाला रिझविण्याचा सफल प्रयत्न होतो. ग्रामदेवताच्या

नावाने भरविलेली जत्रा सांजवेळी तमाशाच्या फडात रंगते. गवळणीतला एखाद्या शब्द तुकडा जिभेवर घोळवीत रात्र संपते. शिणलेले, थकलेले मन गीत गात पुढच्या कामाला तयार होते.

काही गावांमध्ये पट-सोंगट्याचा खेळ होतो. धनगरी ओव्यांच्या स्पर्धा होतात. भैदिक माण्यांची चढोओढ होते. उन्हाळ्यात दुपारच्या वेळी कोकागीत एखाद्या धनिकदाराच्या वाड्यातून ऐकू येते.

धार्मिकता आणि मनोरंजन यांचा संगम -

कोकागीत, कव्वालीची बारी, वाघ्या-मुरळी, उरूस, पोतराजाची गाणी, गोंधळ गीते, वरातीसमोरील घोडानृत्य, भंडपुराण, कथा-कीर्तन ही सादर केली जातात. हातव्याची गाणी, पंचमीची गाणी, श्रमपरिहारार्थ जात्यावरील गाणी, डोहाळे गीत, पाळणे, आरत्या, उपासना गीते, होळी गीते या विविध घटकांमध्ये धर्म आणि मनोरंजन यांचा मेळ बसविला आहे. व्यावहारिकता, धार्मिकता आणि मनोरंजन यांची भेट घडविल्याने नवकार्यासाठी प्रेरणा दिसते. निसर्गाने निर्माण झालेल्या परिस्थितीतून आनंद मिळविता मिळविता समाधानाने जगण्याची आणि सर्वसमावेशक वृत्ती दिसते.

कुस्त्यांचा फड, बैलगाड्यांच्या शर्यती, रेड्यांच्या टकरी, टांगाशर्यती अशा विविध स्पर्धा आयोजून गावातून सरस, सकस पिढी निर्माण करण्याची दृष्टी असते. ग्रामीण भागातील मानवीसमूह मनाचे विवेचन करताना आनंद यादव म्हणतात, " त्या त्या देशाच्या मानव समूहाचा इतिहास, भूगोल, इतर देशांच्या तुलनेने वेगळा असतो. तेथील मानव समूहाने विशिष्ट धर्म स्वीकारलेला असतो. त्या धर्मानुसार त्याच्या जीवनपध्दती विशिष्ट झालेली असते. त्यानुसार त्याच्या धर्मपरंपरा निर्माण झालेल्या असतात. तो मानवसमूह विशिष्ट वंशाचा असतो. भौगोलिक

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

परिस्थितीमुळे ही त्याची जीवनपध्दती विशिष्ट झालेली असते. या सर्वांचा परिणाम होऊन त्याची संस्कृती, समाजरचना व तिचा विकास विशिष्ट पध्दतीने झालेला असतो. या सर्वांच्या दाबाखाली त्या मानवी-समूहाचे मन कार्य करीत असते.... त्यातूनच विशिष्ट जगणे जन्म घेत असते. या विशिष्टतेचा आविष्कार जेव्हा शब्दरूप घेतो, तेव्हा ते साहित्यही त्या देशाचे होऊन विशिष्ट रूप धारण करते."४

"खेड्यातील माणसं, त्यांच्या जीवन जगण्याच्या पध्दती, परिस्थितीनं त्यांच्या पदरी बांधलेले अज्ञान, त्यांना उपसावे लागणारे कष्ट, सदोदित त्यांचा पाठपुरावा करणारं दारिद्र्य, यातून मार्ग काढीत जीवन जगण्याची त्यांची चाललेली धडपड, त्यामुळे वाटयाला येणारी सुखदु:खं याचं समर्थ चित्रण ग्रामीण वाड्.मयानं केलं आहे."५

हे आनंद यादव आणि रा.रं.बोराडे यांनी ग्रामीण साहित्य आणि समूहमनासंबंधी विचार दाखविले आहेत.

## लोकमानस -

कुटुंबरचना, समाजरचना आणि सामाजिक संकेतपध्दती यांच्या भेदामुळेच ग्रामीण कथा आणि नागर कथा असे भेद निर्माण झाले. कृषि-केंद्रितता, निसर्गसन्मुखता, जाती, धर्म आचार- विचार - सण - उत्सव श्रध्दा - धर्म कल्पना या सर्वांमधून ग्रामीण मनोविश्वाची जडणघडण होते. जीवनरचनेचा हा परिणाम आहे. पारंपारिकतेने लोकमानस निर्माण होते. आदिमतेशी संबंध राखून मन प्रगती करत असते.

शहरात पाणवठे नाहीत, विभक्त कुटुंबपध्दती, उद्योगीकरण यामुळे शहरातील लोकमानस वेगळे असते. छापील हास्य, चौकटबध्द कुटुंब (आम्ही दोघं - मुलं दोन) नोकरी, बंगला, गाडी, माडी, शीतकपाट, दूरचित्रवाणी अशा सोयींनी युक्त मनाची जडण-घडण वेगळीच होते. घड्याळाचाच एक भाग बनलेली माणसं संवेदनाच हरवून बसतात. संवेदनेपेक्षा वेदनाच जास्त

अशी स्थिती सरळपणे दिसते.

एकंदरीत सभोवतालचा भूभाग, तेथील समाज, त्याचे विचार, धर्मविचार, आचार, परंपरा, नैतिकता, आर्थिक परिस्थिती, जाती, जातीअंतर्गत व्यवहार, अल्पसंख्यांकाशी बहुसंख्यांकांचे संबंध, गावाविषयीचा अभिमान आणि पर्यायाने आपल्या संपूर्ण गावाविषयी बंधु-भावविषयक संकल्पना या सर्वच घटनांचा - घटकांचा ज्या साहित्यामध्ये समन्वय साधला जातो. ते खरे ग्रामीण साहित्य होय. याचा पूर्ण प्रत्यय जो देऊ शकतो तोच खरा ग्रामीण साहित्यिक मानता येईल.

विविध घटकावयवांनी एकसंघ बनलेल्या वैशिष्ट्यपूर्ण ग्रामजीवनाचं आकलन आनंद यादव यांनी कितपत केले आहे ? आकलनोत्तर चित्रण त्यांनी कसे आणि कितपत केले आहे ? हे पाहावयाचे आहे. त्यासाठी 'माती-खालची माती'(१९६५),[6] 'खळाळ'(१९६७), 'झवरणी'(१९८२)या साहित्यकृतींचा त्यादृष्टीने अभ्यास करावयाचा आहे.

संदर्भ -


१. आनंद यादव, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९७९, पृ. ९

२. गो. मा. पवार, 'ग्रामीण संवेदनशीलता', सकाळ, कोल्हापूर. साहित्य पुरवणी, १ ऑगस्ट १९८१.

३. आनंद यादव, 'ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे १९८१, पृ. ४३

४. आनंद यादव, 'ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८१, पृ. १२-१३

५. रा. रं. बोराडे, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', पुणे, जुलै-डिसेंबर १९८०, अंक २१४-२१५, पृ. १०८.